महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे द्वारा आयोजित,

राज्य स्तरीय नवोपक्रम स्पर्धा

सन २०२१-२०२२

नवोपक्रम गट- २

गट - प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक गट

नवोपक्रमाचे शीर्षक

"शाळेतील शेती जेव्हा पालकांच्या शेतात जाते."

सादरकर्ते

श्री. बाबु चांगदेव मोरे

उपशिक्षक

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोमारपाडा केंद्र- दादडे ता- विक्रमगड जि. पालघर

मार्गदर्शक

शंकर धाकल्या हडबाळ,

केंद्रप्रमुख दादडे

नवोपक्रम सादरकर्त्याचा परिचय

१) नवोपक्रमाचे शीर्षक - शाळेतील शेती जेव्हा पालकांच्या शेतात जाते.

२) नवोपक्रम कर्त्याचे नाव - श्री.बाबु चांगदेव मोरे

३) पद - उपशिक्षक

४) संस्थेचे नाव व पत्ता - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोमारपाडा केंद्र- दादडे ता. विक्रमगड जि- पालघर पिन- ४०१ ६०५

५) नवोपक्रम गट - २

६) नवोपक्रम गटाचे नाव - प्राथमिक शिक्षक व मुख्याध्यापक (उपशिक्षक, पदवीधर शिक्षक, प्राथमिक मुख्याध्यापक)

७) कायमचा पत्ता - मु. पो.चाकरवाडी ता. जि. बीड पिन- ४३११२५

८) शैक्षणिक अहर्ता - बी. ए. डी. एड.

९) नोकरीत रुजू दिनांक - १७/०८/२००९

१०) सेवेचा अनुभव - १२ वर्षे ३ महिने

११) मोबाईल क्र - ९८८१२४५०९७ व ९३७०१४३३१०

१२) इमेल - morebabu88@gmail.com

१३) नवोपक्रम योजलेला कालावधी - **०१ जून २०२० ते ३१ मे २०२१**

प्रस्तावना

पालकांचा रोजगार, त्यासाठी त्यांचे होणार स्थलांतर आणि त्यांच्या सोबत त्यांच्या पाल्याचे होणारे स्थलांतर आणि त्यांचे त्यांच्या आरोग्य आणि शिक्षण यावर होणारे परिणार हे आपण सर्वजण जाणतोच. मुलांचे शाळेतून होणारे स्थलांतर थांबविणे आणि त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे यासाठी सर्वजण प्रयत्न करत आहेत. परंतू त्यात अपेक्षित यश मात्र अद्यापपर्यंत आले नाही. माझ्या शाळेत ही समस्या खूप मोठी होती. ती सोडवण्यासाठी विविध उपाययोजना करून पहिल्या पण अपेक्षित यश येत नव्हते.

बाजूच्या परिस्थितीचे निरीक्षण केल्यावर माझ्या लक्षात आले की, माझ्या पाड्यातील पालक जे भात हे एकच पीक शेतात घेतात आणि त्यानंतर पाणी असून ही दुसरे पीक घेतले जात नाही. त्यासाठी अनेक कारणे होती. त्यातील सर्वात महत्त्वाचे कारण होते मार्गदर्शन. शिवाय भात पिकातून मिळणारे उत्पादन व त्यातून मिळणारे पैसे खूपच कमी मिळत. त्यामुळे पालकांना बाहेर कामाच्या शोधत जावे लागत होते. शिवाय त्यांच्या खाण्यापिण्यात ही भात हे एकच मुख्य पीक असल्याने मुलांमध्ये कुपोषण जास्त प्रमाणात असायचे. ज्याचा अप्रत्यक्ष परिणाम शिक्षणावर ही होत होता. या वर काय उपाययोजना करावी हा विचार करत असताना शेती हा मार्ग दिसला. झाडे लावणे त्यांची काळजी घेणे हा माझा छंदच आहे. त्यामुळे शाळेत ही वृक्षारोपण, परसबाग, रोपे बनविणे, शाळा जागा कमी असल्याने प्लॅस्टिक टबमध्ये विविध पिकांची लागवड विद्यार्थ्यांच्या मदतीने करणे, इ. कामे शाळेत चालायची. याच गोष्टींचा पुढे मला खूप फायदा झाला. आता पालक त्यांच्या शेतात विविध प्रयोग करत आहेत. जसे सोलर पंप, ठिबक सिंचन वापर, विविध पालेभाज्या व फळभाज्या ची लागवड, मोगरा शेती, विविध शासकीय योजनांचा लाभ घेणे, सेंद्रिय शेती, NGO संस्थांची मदत, यातून पालकांना रोजगार तर मिळत आहेच पण रोजगार हमी च्या माध्यमातून पालकांना लखपती बनविण्याचे स्वप्न सध्या मी पाहत आहे. आणि ते काही अंशी यशस्वी ही झाले आहे. आता पालकांमध्ये आत्मविश्वास निर्मिती झाली आहे. ज्यामुळे मुलांचे स्थलांतर १०० टक्के थांबलेच आहे शिवाय पालकांना ही त्यांच्या च पाड्यात रोजगार मिळत आहे. पालक विविध जोडधंदे करू लागले आहे.

शेळीपालन, कुक्कुटपालन, विट व्यवसाय, मत्स्यव्यवसाय, इ. यातून पालक समृद्ध होऊ पाहत आहेत. लाल कांद्याचे विक्रमी उत्पादन घेण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत. शाळेच्या गावात हे सर्व काम करत असताना तालुक्यात ही बऱ्याच ठिकाणी शेती व शेती पूरक व्यवसाय करण्यासाठी कार्यशाळा घेतल्या आहेत. हे सर्व करताना विविध दानशूर व्यक्ती व संस्था खूप चांगले सहकार्य करत आहेत. माझ्या या सर्व कामाची दखल महाराष्ट्र शासनाचे अप्पर मुख्य सचिव रोहयो, मृदा व जल यांनी घेतली आहे. आदरणीय नंदकुमार साहेबांनी स्वतः माझ्या शाळेच्या पाड्यात येऊन मला व माझ्या शेतकरी पालकांना शाबासकी दिली आहे. तसेच साहेबांनी माझी रोजगार हमी योजनेसाठी राज्यस्तरावर प्रशिक्षक म्हणून नेमणूक ही केली आहे. त्या माध्यमातून पाड्यात सध्या विविध कामे चालू आहेत. NGO संस्थांच्या माध्यमातून पाड्यात आतापर्यंत २००० झाडांची लागवड व जोपासणूक यशस्वीपणे केली आहे. राज्य बालरक्षक म्हणून ही खूप चांगले काम करता आले आहे. या नवोपक्रमातून विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी काम करता येत आहे याचा मनस्वी आनंद मिळत आहे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	तपशील	पृष्ठ.क्र.
१	नवोपक्रमाचे शीर्षक	६
२	नवोपक्रमाची गरज व महत्व	६
३	नवोपक्रमाची उद्दिष्टे	७
४	नवोपक्रमाचे नियोजन व कार्यवाही	८
५	नवोपक्रमाची यशस्वीता/ फलनिष्पत्ती	१९
६	समारोप	१९
७	संदर्भ सूची	२१
८	परिशिष्टे	२१

नवोपक्रमाचे शीर्षक

“शाळेतील शेती जेव्हा पालकांच्या शेतात जाते.”

नवोपक्रमाची गरज व महत्त्व

माझी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,खोमारपाडा ही आदिवासी व दुर्गम भागात असलेली शाळा आहे. येथे पालक वर्षभरात केवळ एकच पीक घेतात ते म्हणजे भात.भाताची कापणी व झोडणी झाल्यावर म्हणजे साधारणपणे दिवाळीनंतर रोजगाराच्या शोधत शहरी भागात म्हणजेच वसई,पालघर,बोईसर,मुंबई,कल्याण व भिवंडी इ.ठिकाणी बांधकाम,मासेमारी,वाळू उपसा करणे, शेतीची कामे,वीटभट्टी इ. विविध कामासाठी स्थलांतर करतात. स्थलांतर करताना कित्येक पालक आपल्या पाल्याला ही सोबत घेऊन जातात. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण व्हायचा. तो असा की शासनाने शाळेत शिकणारी मुले कुठे ही गेली किंवा आली तरी त्यांना जवळ पडेल त्या शाळेत ते त्यांचे शिक्षण घेऊ शकतात.परंतू संबंधित ठिकाणचे वातावरण,सोबत शिकणारी नवीन अनोळखी मुले, शिक्षक, पालकांचे दुर्लक्ष इ. करणारे मुले एकतर शाळा बाह्य होतात किंवा त्यांचा त्यांचा गुणवत्तेवर परिणाम होतो. ही बाब माझ्या शाळेतून स्थलांरीत होऊन जाणाऱ्या मुलांच्या बाबत ही घडत होती. अशी स्थलांतर करून जाणारी माझ्या शाळेतील मुले ही १५ ते १७ च्या दरम्यान असायची. मुलांचे स्थलांतर थांबविणे गरजेचे वाटत होते. पण ते कसे थांबविता येईल हे मात्र समजत नव्हते. मी स्वतः एक शेतकरी कुटुंबातील असल्याने मला शेती विषयक काही प्राथमिक माहिती होती. आणि जमीन व पाणी असेल तर आपण उत्तम शेती करू शकतो हे ही माहीत होते. माझ्या शाळेच्या पाड्यात ह्या दोन्ही गोष्टी चांगल्या प्रकारे उपलब्ध होत्या. त्यामुळे भात शेती नंतर आपण इतर ही पिके घेऊ शकतो असा विचार माझ्या मनात आला जो पालक स्थलांतर पर्यायाने मुलांचे स्थलांतर थांबविण्यासाठी रामबाण उपाय होऊ शकतो असा विचार माझ्या मनात आला. त्या अनुषंगाने शाळेत आम्ही प्लॅस्टिक टब मध्ये(शाळेला जागा नसल्याने) रताळे, बटाटे, मिरची व अद्रक तसेच शाळेसमोर जिवल गहला ह्या पालकाच्या दोन गुंठे जागेत कांदा, वांगे, टोमॅटो, मेथी, पालक, शेपू, गवार इ. पिके मुलांच्या मदतीने घेतली होती. मुलांचे स्थलांतर थांबवायचे असेल तर त्यांच्या पालकांना पाड्यात रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे होते. त्यामुळे शेती मार्गदर्शनातून पालकांचे पर्यायाने मुलांचे स्थलांतर थांबविण्यासाठी सदर चा नवोपक्रम घेण्याचे ठरविले.

नवोपक्रमाची उद्दिष्टे

माझ्या नवोपक्रमाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

१) मुलांचे आणि पालकांचे स्थलांतर थांबविणे.

२) मुलांचे कुपोषण कमी करणे

३) पालकांना भात शेतीशिवाय इतर विविध पिके घेण्यासाठी व शेती पूरक व्यवसाय करण्यासाठी प्रेरित करणे.

४) विविध शासकीय योजनांचा व सामाजिक संस्थांचा पालकांना लाभ मिळवून देणे.

५) पालकांना पाड्यातच रोजगार निर्मिती सोबत लखपती करणे.

नवोपक्रमाचे नियोजन

मी माझ्या नवोपक्रमाचे नियोजन खालील प्रमाणे केले होते.

१) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण

पूर्वी पाड्यातील पालक हे शेतात भात हे एकच पीक घेत होते. त्यानंतर ते रोजगाराच्या शोधत जवळील शहरात विविध कामाच्या शोधत बाहेर स्थलांतर करायचे. इतर कोणी मुलांचा सांभाळ करायला कोणी नसल्याने ते शाळेत शिकणाऱ्या पाल्याला ही सोबत घेऊन जायचे. ही संख्या ९० पट असताना १५ ते १७ च्या दरम्यान असायची. त्यामुळे मुलाच्या शिक्षणाचा प्रश्न उपस्थित होत होता. त्यामुळे मुले एक तर अनियमित व्हायची, शाळा बाह्य व्हायची किंवा त्यांच्या गुणवत्तेवर नकारात्मक परिणाम व्हायचा. तसेच पालक शेतात भात हे एकच पीक घेत असल्याने व आहारात त्याचाच जास्त समावेश होत असल्याने मुलांमध्ये कुपोषण जाणवायचे. ही संख्या पण १२ ते १७ पर्यंत असायची. शिवाय पालक बाहेर कामाला गेल्यावर त्यांची आर्थिक पिळवणूक खूप जास्त व्हायची.

२) संबंधित व्यक्ती, तज्ज्ञांशी चर्चा

शाळेत शिकणाऱ्या मुलांचे त्यासाठी पालकांचे स्थलांतर शेतीच्या माध्यमातून थांबविण्याचे ठरविल्यानंतर त्यासाठी काय करावे लागेल? कोणती पिके घ्यायची? खते, बाजरपेठ, पाणी देण्याची व्यवस्था, अंतर्गत मशागत इ. बाबींची माहिती पालकांना देणे गरजेचे होते. तसेच शेती पूरक व्यवसाय कोणते करता येतील? जसे कोंबडीपालन, बकरी पालन इ. ची जोड देता येईल का? यासाठी **महाराष्ट्र शासनाचे अप्पर मुख्य सचिव आदरणीय नंदकुमार साहेब(रोहयो, मृदा व जलसंधारण), प्रगतशील शेतकरी तथा अभिनव फार्मर्स क्लब चे मा. ज्ञानेश्वर बोडके, तालुका कृषी विभागाचे कृषी सहाय्यक श्री. ढाक साहेब, रोजगार हमी योजनेचे रोजगार सेवक बाळा भेसार, अजित गोरे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कारले, माझी आई इंदुमती मोरे, बस कंडक्टर सुग्रीव सुरवसे, अक्षरधारा फौंडेशन मुंबई व लहान भाऊ बाळासाहेब मोरे, अभयचन्द्र सावंत** यांचा वेळोवेळी सल्ला घेतला त्यांच्याशी चर्चा केली.

३) आवश्यक साधनांचा विचार

शेती व शेती पूरक व्यवसाय यांच्या माध्यमातून पालकांचे स्थलांतर थांबवायचे हे ठरल्या नंतर कोणत्या पिकांची लागवड करायची, आवश्यक ते बियाणे कोठून मिळतील? खते कोणती वापराची? पाण्याची उपलब्धता कशी आहे? पिकांवर बीजप्रक्रिया कशी करायची? रोगराई आली तर काय करायचे? कोणती कीटक नाशके फवारायची? कोणते शेती पूरक व्यवसाय करता येतील? त्यासाठी शासनाच्या कोणत्या विभागाची कोणत्या योजनेसाठी मदत घ्यायची? तसेच त्यासाठी आवश्यक पात्रता व कागदपत्रे कोणती लागतील? फळझाडे व फुलशेती करता येईल का? त्यासाठी शासकीय योजना व सामाजिक संस्थांची मदत मिळेल का? इ. बाबींचा विचार केला होता.

४) करावयाच्या कृतीचा क्रम

पालकांना शेतीकडे वळविणे व त्या माध्यमातून त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे हे मनाशी पक्के केल्यानंतर त्यासाठी पाड्यातील पालकांना शाळेत बोलावून त्यांची मिटिंग घेतली. त्यांना आपण भात शेतीनंतर ही शेती करू शकतो. त्यात विविध पिके आपल्याला घेणे शक्य आहे. पालकांच्या स्थलांतर होण्याचे तोटे त्याचा मुलाच्या जीवन व शिक्षणावर होणार परिणार, तसेच आपण किती दिवस मजूर म्हणून काम करणार? मी तुम्हाला मालक बनण्याची संधी देतो. असा संवाद पालकांशी केला. त्यात पालकांनी त्यांच्या ही काही शंका विचारल्या. त्याचे शंका समाधान करण्यात आले. त्यानंतर शाळेतील प्रोजेक्ट वर प्रगत शेती वर तीन चार व्हिडीओ पालकांना दाखविले. त्यामुळे त्यांची मानसिक तयारी झाली. त्यानंतर रोजगार हमी योजना, कृषी विभाग यांच्या विविध योजना व त्यांचा लाभ कसा घ्यायचा? त्याचा आपल्याला कसा फायदा होणार? याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पिके कोणत्या शेतात कोणती घ्यायची? जमिनीची मशागत, रोपे बनविणे, त्यांची पुनर्लागवड, पाणी कोणत्या पिकांना कसे व किती द्यायचे, कमी कालावधीत येणारी पिके(३० ते ३५ दिवस, माध्यम कालावधी लागणारी (३५ ते ७०) व जास्त कालावधी लागणारी पिके (७० पेक्षा जास्त दिवस) यांचे नियोजन केले. ज्यामुळे पालकांना मध्ये मध्ये पैसे मिळतील. शेतात तयार झालेला माल स्वतः विकण्यावर भर देणे, शेताचे काम नसेल तेव्हा रोजगार हमी कामावर जाणे, मोगरा, आंबा,आवळा, सीताफळ इ . ची लागवड करणे. जमिनीची अंतर्गत मशागत करण्यासाठी खुरपे इ. साहित्य उपलब्ध करणे. तसेच भाव नसेल तर शेत माल साठविणे. आवश्यक तेव्हा शेकऱ्यासाठी कार्यशाळा आयोजित करणे.

५) उपक्रमोत्तरस्थितीचे निरीक्षण

सदर नवोपक्रम राबविल्यानंतर त्याचे खूप सकारात्मक परिणार दिसू लागले. जसे मुलांचे स्थलांतर शून्य झाले. पालकांचे स्थलांतर ही ८० ते ८५ टक्के कमी झाले. पालक विविध पिके व भाजीपाला शेतात पिकवायला लागल्याने व तो त्यांच्याही आहारात जाऊ लागल्याने पालकांचे आरोग्य व मुलांमधील कुपोषण खूप कमी झाले. तसेच मुलांमधील किरकोळ आजर ९५ टक्क्यांपर्यंत कमी झाले. तसेच पालक भात शेतीसोबत विविध पालेभाज्या, फुलशेती, फळझाडे इ. ची लागवड करू लागल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला.

६) कार्यवाहीचे टप्पे

नवोपक्रमाची कार्यवाही खालील टप्प्याने करण्यात आली.

- **जून ते ऑक्टोबर** - भात पिकांचे विविध वाण रोप बनविणे व पुनर्लागवड करणे, पावसाळा भाजीची लागवड करणे व स्वतः विक्री करणे, कृषी व रोजगार हमी च्या माध्यमातून मोगरा, आंबा व इतर फळझाडे लावणे, NGO संस्थांच्या माध्यमातून पालकांना झाडांची रोपे पुरविणे. रोजगार हमी च्या विविध वैयक्तिक लाभ घेण्यासाठी अर्ज करणे.
- **ऑक्टोबर व नोव्हेंबर** - भात पिकाची कापणी व झोडणी, इतर पिके घेण्यासाठी जमिनीची मशागत करणे, रोपे बनविणे, कृषी विभाग आणि NGO संस्थांच्या माध्यमातून विविध बियाणे मिळविणे.
- **डिसेंबर ते एप्रिल** - तयार झालेली रोपे लावणे, पालकांची मिटिंग, क्षेत्र भेट करणे, बीजप्रक्रिया करून लागवड, अंतर्गत मशागत, तयार मालाची विक्री, रोजगार हमी च्या विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ आणि कामावर जाणे.
- **मे** - अद्रक, हळद इ. पिकांची लागवड करणे, जमिनीचा राब व झाडे लावण्यासाठी खड्डे खोदणे.

७) उपक्रमासाठी इतरांची मदत

सदर उपक्रमासाठी रोजगार हमी योजनेचे **अतिरिक्त अप्पर मुख्य सचिव आदरणीय नंदकुमार साहेबांचे विशेष सहकार्य लाभले.** त्यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या रोजगार हमी योजनेचा राज्य प्रशिक्षक म्हणून काम करण्याची संधी ही मिळाली आहे. त्याच बरोबर संगमनेर येथे कार्यरत सहाय्यक गटविकास अधिकारी मा. संदीप वायाळ साहेब, मा.ज्ञानेश्वर बोडके सर, अक्षरधारा फौंडेशन- मुंबई यांनी मार्गदर्शन व आर्थिक स्वरूपात मदत केली आहे. इस्कॉन संस्था, बायफ संस्था, कृषी विभाग-विक्रमगड, रोजगार हमी विभाग- विक्रमगड पंचायत समिती, मा. अभयचन्द्र सावंत साहेब- बेलापूर(मुंबई), मा. योगेश चौधरी(विक्रमगड) मा. रवी बेंदर(कासा), माझा लहान भाऊ, बाळासाहेब मोरे, कृषी सहाय्यक मा. ढाक साहेब, आई इंदुमती मोरे, रोजगार सेवक- बाळा भेसरा, बस कंडक्टर मा. सुग्रीव सुरवसे, केंद्रप्रमुख- मा. हडबाळ सर, भाऊ चासकर – (प्रयोगशील शिक्षक) मा. राजेंद्र कुमार खताळ (गटविकास अधिकारी विक्रमगड), इ. ची खूप मोलाची मदत सदर नवोपक्रमासाठी झाली.

८) पुरावे

नवोपक्रमाची कार्यवाही

१) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी

सदर नवोपक्रम राबविण्या अगोदर पालकांचे व त्यांच्या सोबत शाळेत शिक्षण घेणारी मुले मोठ्या प्रमाणात स्थलांतर करत होती. पालक त्यांच्या शेतात पारंपरिक भात हे एकच पीक घेत होते त्यानंतर साधारणपणे भाताची झोडणी करून दिवाळीनंतर स्थलांतर करत होती. कारण होते रोजगाराचा शोध. भात पीक नंतर किंवा सोबत आपण इतर ही पिके आपल्या शेतात घेऊ शकतो हा विश्वास किंवा माहिती पालकांना फारशी नव्हती. त्यामुळे पिढ्यानपिढ्या त्यांचे स्थलांतर होत होतं. त्या स्थलांतराचा फटका घरातील शाळेत जाणारी मुले आणि वृद्ध व्यक्तींना बसत असे. मुलांमध्ये कुपोषण जास्त प्रमाणात दिसून यायचे. त्यामुळे किरकोळ आजारांनाही मुले लवकर बळी पडत. पालक कामाला बाहेर गेल्यावर मुलांच्या शिक्षणावर दुष्परिणाम होत. तसेच बाहेर गावी कामाला गेल्यावर प्रतिदिन ४०० ते ७०० रु. मजुरी मिळत असून ही पालक चार-पाच महिने काम करून सोबत २०,०००ते ३०,००० रु. बचत करून घेऊन येऊ शकत होते. त्यामागे कारण असे होते की, सतत काम न मिळणे, मालकाकडून होणारी फसवणूक,आजारपण, व्यसन इ.मुळे पालक खूपच कमी बचत करू शकत होते. त्यामुळे संबंधित कुटुंबाची आर्थिक स्थिती आहे तशीच राहत होती. लोक शासकीय योजना आणि त्यांचे लाभ घेण्याचे किंवा माहितीचे प्रमाण खूपच नगण्य होते.

२) कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहितीचे संकलन

सदर नवोपक्रम राबविण्याचे सुरू झाल्यावर पालकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. पड्यातच राहून शेती व विविध व्यवसायांच्या माध्यमातून बाहेर मिळतात त्यापेक्षा जास्त पैसे आपल्याला मिळू शकतात हे पालक स्वतः हून बोलू व अनुभवू लागले. कोरोना काळात बाहेर कामाला जाण्यापेक्षा पाड्यात राहून शेती केलेली चांगली अशी चर्चा पालक आपसात करू लागले. वेगवेगळ्या कालावधीत येणारी पिके घेतल्याने त्यांना सतत पैसे मिळू लागले. त्यामुळे शेती प्रति त्यांचा विश्वास वाढला. भात शेतीनंतर पालक त्यांच्या शेतात गवार, दुधी, कारले, हरभरे, भेंडी, दोडका, मका, टोमॅटो, पालक, कोथिंबीर, मेथी, वांगे, सूर्यफूल, शेपू, टरबूज, तूर, अद्रक इ. पिके घेऊ लागली. त्याच बरोबर मोगरा आणि आंबा याची ही लागवड शासकीय योजनांच्या माध्यमातून पालक करू लागले. शेतातील कामे करून पालक रोजगार हमी च्या कामाला ही जाऊ लागली. त्यामुळे त्या योजनेच्या माध्यमातून गायगोठा, कुक्कुटपालन शेड, शेत तलाव, शेळीपालन शेड इ. वैयक्तिक लाभाच्या योजनांचा प्रत्यक्ष लाभ पालकांना मिळवून दिला.

त्याचा फायदा ही उत्पन्न वाढीसाठी होऊ लागला. रासायनिक शेती बरोबरच पालक सेंद्रिय शेतीचा विचार करू लागली. तालुका कृषी विभागाच्या माध्यमातून विविध बियाणे व प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले. अक्षरधारा व इतर सामाजिक संस्थांच्या माध्यमातून ही बरीच मदत पालकांना झाली.

३) उपक्रम पूर्ण झाल्यावर निरीक्षणे व त्याच्या नोंदी

नवोपक्रम पूर्ण झाल्यावर असे लक्षात आले की, पालकांचे स्थलांतर प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. त्यामुळे शाळेत शिकणाऱ्या मुलांचे स्थलांतर प्रमाण शून्यावर आणण्यात १०० टक्के यश आले. मुलांमध्ये असलेले कुपोषणाचे प्रमाण ९० ते ९५ टक्क्याने कमी झाले. मुले एकाच ठिकाणी राहिल्यानेकोरोना काळात त्यांना ऑनलाइन ऑनलाइन शिक्षण चांगल्याप्रकारे देणे शक्य झाले. त्यामुळे त्यांची गुणवत्ता वाढ करणे शक्य झाले. पालकांना फक्त रोजगार नाही तर त्या माध्यमातून काही पालक लखपती ही झाले आहेत. शेती बरोबर लोक शेती पूरक व्यवसाय करू लागले. NGO संस्थांच्या माध्यमातून बियाणे, मार्गदर्शन इ. बाबी दिल्याने त्यांचा चांगला फायदा झाला. तसेच पालकांना आवळा, जांभूळ, सीताफळ, काजू आशा २००० ते २५०० फळझाडांची लागवड अक्षरधारा व सुहृद फौंडेशन मुंबई च्या माध्यमातून केली. भविष्य आर्थिक उत्पन्न वाढीसाठी या झाडांचा नक्कीच फायदा पालकांना होईल. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत सहा कुक्कुटपालन शेड, तीन गायगोठे, तीन शेत तलाव, १२ गायगोठे मंजूर झाले आहेत. १७ आंबा लागवड प्रकरणे आणि १७ आंबा लागवड प्रकरणे कृषी विभाग विक्रमगड यांच्या कडून झाली आहेत. ज्यांचा खूप सारा फायदा पालकांना होणार आहे.

४) कार्यवाहीत आलेल्या अडचणी

सदर नवोपक्रम राबवत असताना काही अडचणी ही आल्या. ज्याच्यात कोरोना काळ असल्याने शेत माल विक्री ची अडचण आली. व्यापारी खुप कमी दराने शेत माल मागत, काही शेतकऱ्यांना पिकाच्या शेवटच्या टप्प्यात पाणी कमी पडले, लाईटची व्यवस्थीत सोय असल्याने बरेच शेतकरी डिजन इंजिन शेताला पाणी देण्यासाठी वापरतात त्यामुळे डिझेल चा खर्च ही जास्त झाला. पाणी देण्यासाठी पाईप व इंजिन किंवा पाणी मोटार स्वतः ची नसल्याने ते ही भाडे शेतकऱ्यांना ५००० रु. पर्यंत आले. माझ्या शाळेच्या पाड्यात गावातील गुरेढोरे होळी सणा पर्यंत बांधले जातात त्यानंतर मोकाट सोडली जातात त्यामुळे शेतातील पिकाची राखण करणे खूप कठीण होते. त्यातून काही वेळेला वाद ही निर्माण झाले. काही पिकांना बुरशी रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उपाय करून ही २० ते ३० टक्के पिकांचे नुकसान झाले. या सर्व अडचणींना सामोरे जावे लागले.

माहितीचे विश्लेषण, आलेख, तक्ते

(१)

भात शेती शिवाय इतर पिके घेणारे पालक पूर्वी	४
भात शेती शिवाय इतर पिके घेणारे पालक आता	५०



(२)

स्थलांतर होऊन जाणारे विद्यार्थी पूर्वी	१७
स्थलांतर होऊन जाणारे विद्यार्थी आता	०

शासकीय योजनांचा लाभ घेणारे पालक पूर्वी	१० टक्के
शासकीय योजनांचा लाभ घेणारे पालक आता	९० टक्के



शेतीतून लखपती होणारे शेतकरी पूर्वी	०
शेतीतून लखपती होणारे शेतकरी आता	१०



मदत करणाऱ्या NGO संस्थांची संख्या पूर्वी	०
मदत करणाऱ्या NGO संस्थांची संख्या आता	०४

पालकांचे स्थलांतर पूर्वी	८० ते ९० टक्के
पालकांचे स्थलांतर आता	१० ते २० टक्के



नवोपक्रमाची यशस्वीता

सदर नवोपक्रमातून खालील प्रमाणे यश मिळविता आले.

१) शाळेतील मुलांचे १०० टक्के व पालकांचे ८० ते ९० टक्के स्थलांतर थांबविता आले.

२) मुलांचे कुपोषण ९५ टक्क्यांपर्यंत कमी झाले.

३) पालक विविध पिके घेऊ लागली व त्यालाच जोडून शेतीपूरक व्यवसाय ही करू लागली.

४) पालकांना विविध शासकीय योजना आणि NGO संस्थांची मदत मिळवून देण्यात यश आले.

५) पालकांना फक्त रोजगार नाही तर लखपती बनविण्यात ही यश आले.

समारोप

शाळेत प्लॅस्टिक टबमध्ये सुरू झालेली शेती पालकांच्या शेतापर्यंत गेली आणि त्याचा खूप चांगला फायदा विद्यार्थी आणि पालकांना झाला. तसे पाहिले तर मुलांचे व पालकांचे स्थलांतर थांबविणे खूप मोठी समस्या आहे. परंतू सदर नवोपक्रमातून पालकांचे व विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबलेच शिवाय विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण आणि पालकांना रोजगार सोबतच लखपती ही बनण्याची संधी येथे निर्माण झाली. त्यामुळे या नवोपक्रमातून खूप सारा आनंद आणि समाधान मिळत आहे. इतर ही ठिकाणी हा नवोपक्रम नक्कीच खूप लाभदायक ठरू शकतो. ज्या माध्यमातून विद्यार्थी व पालकांना एक प्रकारचे स्थैर्य मिळू शकते.

संदर्भसुची व परिशिष्टे

संदर्भ ग्रंथ

- ऍग्रोवन पेपर
- सेंद्रिय शेती - डॉ. प्रशांत नाईकवाडी
- सेंद्रिय शेतीची यशोगाथा- डॉ. चित्रलेखा पुरंदरे

❖ नवोपक्रमाची यूट्यूब लिंक

युट्युब लिंक-

https://youtu.be/1xb4W0HhlQI

दुसरी

https://youtu.be/JDLkVLiAmgI

तिसरी

https://youtu.be/rAsCXtSweZQ

चौथी

https://youtu.be/PlZlHjofkPI

नवोपक्रमात सहभागी शेतकरी

१) जयसुक संत्या टोकरे

२) कृष्णा लक्ष्मण वागलोडे

३) सोन्या लक्ष्मण टोकरे

४) वालक्या धाकल पागी

५) रवींद्र यशवंत गहला

६) बाबन नवश्या बरफ

७) लाडक्या भिकार बेंडगा

८) काकड्या गणपत खरपडे

९) चंदू वामन टोकरे

१०) रामा लाडक्या चौधरी

११) सोनी महादू टोकरे

१२) जिवन लक्ष्मण टोकरे

१३) सदू महादू ईभाड

१४) जयेश रामू पागी

१५) किसन रुपजी पागी

१६) विजय किसन पागी

१७) गणेश माधव बांबरे

१८) विश्राम गोविंद गहला

१९) सुरेश भिवा चिमडा

२०) विनोद बाबन गहला

२१) मनोज बाबन गहला

२२) जिवल धाक्या गहला

२३) मिथुन दामू गहला

२४) कृष्णा रामजी काटकरी

२५) रिशा रघुनाथ गहला

२६) सखाराम जयराम टोकरे

२७) सचिन किरण गहला

२८) संदीप लहू उंबरसाडा

२९) काशीराम रामू गहला

३०) महेश गोपाळ गहला

३१) बाळू यशवंत गहला

३२) मदन सीताराम उंबरसाडा

३३) सोमा अर्जुन उंबरसाडा

३४) वसंत रुपजी उंबरसाडा

३५) विनोद धाक्या उंबरसाडा

३६) भिकल संत्या उंबरसाडा

३७) वसंत बारकू ओझरे

३८) मंगेश चिंतू काटकरी

३९) देवराम सदू खरपडे

४०) अनंता बाबु चिमडा

४१) विष्णु अनंता चिमडा

४२) दत्तू हरजी ठाकरे

४३) अनिल लखमा लहांगे

४४) दिलीप वाज्या खरपडे

४५) रामा माह्या बोगे

४६)संती हरजी ठाकरे

४७) लक्ष्मण बाबन उंबरसाडा

४८) रुपजी चिंतू वागलोडे

४९)राज्या बंदु उंबरसाडा

५०) परशुराम चंद्रकांत ओझरे

केलेल्या पिकांची यादी

१) तूर

२) हरभरा

३) मका

४) मुळा

५) कांदा

६) गवार

७) वांगे

८) सूर्यफूल

९) काळा भात

१०) शेंगदाणे

११) नागली

१२) पालक

१३) शेपू

१४) मेथी

१५) कोथिंबीर

१६) टोमॅटो

१७) दुधी

१८) गलका

१९) दोडका

२०) कारले

२१) अद्रक

२२) मोगरा

२३) वटाणा

२४) मिरची

२५) कोबी

२६) भेंडी

नवोपक्रमासाठी मदत करणाऱ्या सामाजिक संस्था

१) अक्षरधारा फौंडेशन- मुंबई

२) सुहृद फौंडेशन - मुंबई

३) इस्कॉन संस्था- गालतरे

४) बायफ संस्था- जव्हार

उपक्रमाच्या बातम्या

नगरी SMART ठाणे-वसई-पालघर

सोमवार, ६ जुलै २०२०

शेतीने अडवला पालकांच्या स्थलांतराचा मार्ग !

पटसंख्या वाढली, पालकांना अर्थार्जन

शिक्षकांनी पिकवले रोजगाराचे मळे

आदिवासी खेड्यात लॉकडाउनच्या काळातही शेतीतून उत्पन्न

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कोरोना काळात गावातील लोकांचा रोजगार आणि विद्यार्थ्यांच्या शाळा या दोन्हींचे नुकसान झाले आहे. पालघर जिल्ह्यातील विक्रमगड तालुक्यातील खोंडगावाडा केंद्र या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांच्या विविध उपक्रमांमुळे या गावात कोरोना काळातही सुखाचा पाडावयास मिळाली. इतकेच नव्हे तर भरपावसात शिक्षणही सुरू राहिले.

गावातील या शाळेत विद्यार्थी फार काळ टिकत नसत, कारण ते स्थलांतरीत होत. तर अनेक घरांत पालक शिक्षित नसल्याने गावातील विद्यार्थ्यांमध्येही शिक्षणाविषयी फारसे स्वारस्य नव्हते. अशाच्येळी २०१३मध्ये या शाळेत रुजू झालेले शिक्षक बाबु मोरे यांनी जास्तीत जास्त विद्यार्थी शाळेत यावे यासाठी वेगळा प्रयोग करण्याचा विचार सुरू केला. त्यांनी शाळेच्या आवारात टपामध्ये बटाटे, आले, मिरची, लसूणे आदी भाज्या पिकवण्यास सुरुवात केली. या शाळेत काही ठी वेगळे होते आहे, हे पाहून विद्यार्थी शाळेत यायला लागले.

काही दिवसांनंतर शाळेसमोरच्या पडक्या जमिनीवर श्रमदान करून तेथेही भाज्या पिकवण्यास सुरुवात केली. पाहून शालेय पोषण आहारासाठी आवश्यक भाज्यांचे उत्पादन तिथल्या तिथे होऊ लागले. मग स्थलांतरीत लोकांना गावात थांबवण्यासाठी अशा पालकांची सभा घेऊन त्यांना शेतीचे महत्त्व पटवून दिले. यामुळे शाळेतील शिक्षकांनी कठोर परिश्रम घेतले. यानंतर गावात घरोघरी शेती दिसू लागली. पालकांना पाहून उत्पन्नही मिळू लागले.

कोरोनाकाळात पालकांचे उत्पन्नाचे साधन मिळाले. गावातील १८ कुटुंबांना गावातच रोजगार मिळाल्याने त्या आल्याचे मोरे सांगतात. त्यांच्या या कार्यात अक्षरधारा फाउंडेशन, विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी सहदेव फाउंडेशन यांनी विशेष सहकार्य केले. तर केंद्रप्रमुख हडकाळ, विस्तारअधिकारी मोकाशी, गटशिक्षणाधिकारी पवार तसेच गटविकासाधिकारी खताळ यांनी नेहमीच त्यांना प्रोत्साहन दिले. तसेच पालघर जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष व शिक्षणसमितीचे सभापती जितेश सांबरे यांनीही या कामात शिक्षकांचे खूप दिली. आता हा उपक्रम गावातील अन्य ५० कुटुंबांपर्यंत विस्तारण्याचा शाळेचा विचार आहे, असेही मोरे यांनी सांगितले.

शिक्षणही सुरू राहिले

लॉकडाउनमुळे शाळा बंद झाल्या असल्या तरी विद्यार्थ्यांचे शिक्षण मात्र थांबलेले नाही. अदिवासी दुर्गम क्षेत्रातील येथील शाळेत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग आहेत. एकुण ६१ मुले तिथे शिकतात. लॉकडाउनच्या काळात मुलांचे शिक्षण कसे चालू राहील, हा मोठा प्रश्न होता. असे मोरे सांगतात. शिवाय पाळाडात मोबाइल नेटवर्क नसल्याने डिजिटल माध्यमांतून शिकविणे शक्य नव्हते. मग शाळा व्यवस्थापन समितीची बैठक मुलांचे शिक्षण कसे चालू ठेवता येईल, यावर चर्चा झाली. यानंतर मुलांना पाठ्यपुस्तक दिली व स्वतःही अभ्यास करण्यास सांगितले.. ज्या ठिकाणी मुलांना आढळून जाणवेल त्याठिकाणी घ्यायलाच्या कोणाची तरी तसेच शिक्षकांचेही मदत घ्यायला सांगितले. अशाप्रकारे सध्या शाळा बंद असूनही शिक्षण सुरू आल्याचे मोरे यांनी सांगितले.

તમારા ભવિષ્યનું જાતે જ નિર્માણ કરો

જિંદગીમાં બદલાવા માટે આપણો એટીટ્યુટ જ છે જે આગળની યાત્રા નક્કી કરે છે. અહીં તેના ઉદાહરણ રજૂ કર્યા છે.

પ્રથમ ઉદાહરણ : બાબુ મોરે મહારાષ્ટ્રના પાલઘર જિલ્લામાં ખોમારપાડા આદિવાસી વિસ્તારમાં આવેલી પ્રાથમિક શાળામાં શિક્ષક છે. તેમણે પોતાની સ્કૂલની આજુબાજુના દશથી વધુ ગામડાના શિક્ષક બનવાનું નક્કી કર્યું છે! અહીંનો મુખ્ય વ્યવસાય ખેતી છે. આ વિસ્તારમાં વરસાદ સારો થતો હોવાથી લોકો અનાજની વાવણી કરી છે. વરસાદની સીઝન ના હોય ત્યારે દર વર્ષે ડિસેમ્બરમાં વરસાદ પહેલા પાછા ફરવાના ઈરાદા સાથે તેઓ ઈંટોની ભઠ્ઠી કે બાંધકામ સાઈટો પર કામ કરવા જતા રહે છે. બાળકો પણ તેમની સાથે જતા રહે છે, એટલે તેમનો અભ્યાસ પ્રભાવિત થાય છે.

આથી આ 33 વર્ષના શિક્ષકે શિખવાડતા પહેલા જાતે જ ખેતી કરવાનો નિર્ણય લીધો. આ વર્ષે તેમણે ડુંગળી, ખીરા, રીંગણ અને અન્ય શાકભાજી વાવી. તેમાં તેમને સારા પૈસા મળ્યા અને ત્યાર પછી બીજા લોકોએ પણ તેને અપનાવ્યું. 2019-20માં સ્થાનિક એનજીઓ અક્ષરધારા ફાઉન્ડેશનની અહીં નજર પડી. તેણે બીજા 40 વાલીઓને રાજી કર્યા. આ છ વર્ષોમાં બાબુ મોરે સ્થળાંતરને સંપૂર્ણપણે રોકવામાં સફળ રહ્યા અને 10 ગામના 100 ખેડૂતો રોટેશન પાક અંગે જણાવીને તેમની મદદ કરી. આજે ત્યાં એક પણ સ્કૂલ ડ્રોપઆઉટ નથી.

બીજું ઉદાહરણ : તમારી સોસાયટીના ક્લબ હાઉસમાં આવીને

शेतीतून फुलवला शिक्षणाचा मळा

अनिकाडमध्येही भोजक्यांना विक्रीचे परिसरात हात दिला.

कार्यकर्ता शिक्षक

शिक्षक ने ग्रामीणों का पलायन रोकने के लिए उन्हें हरी सब्जियों की खेती के लिए किया प्रेरित: पलायन रुकने से बढ़ी स्कूल में बच्चों की संख्या

प्राथमिक विद्यालय के शिक्षक का कमाल, सुर्खियों में नौनिहाल, अभिभावकों को रोजगार

योगेंद्र सिंह
patrika.com

पलामू. कहते हैं कि हौसला मजबूत हो और मकसद के लिये कुछ कर गुजरने का जज्बा हो तो बड़ी से बड़ी रुकावट दूर की जा सकती है। इस कहावत को पलामू जिला परिषद के प्राथमिक स्कूल के एक शिक्षक ने बड़ी सार्थक कर दिखाया है। जनजातीय क्षेत्रों में रहने वाले गरीब आदिवासी परिवार हर वर्ष मजदूरी के लिए शहरों की ओर पलायन कर जाते हैं।

और इनके साथ इनके छोटे-छोटे बच्चे भी चले जाते हैं। जिससे वह शिक्षा से वंचित होकर बाल मजदूरी के जाल में फंस जाते हैं। शिक्षक के प्रयास से इन ग्रामीणों को क्षेत्र में ही

फाइल फोटो

रोजगार मिले जिससे उनका पलायन रुक गया और इससे स्कूल में बच्चों की संख्या में कम नहीं हुई, बच्चे पढ़ रहे हैं तो उनके पिता रोजगार का सपने का भाग-दौड़ कर रहे हैं।

बीडू जिले के रहने वाले बाबू चांगदेव मोरे ने 2009 में विकासखंड तालुका के जोगे के जिला परिषद के प्राथमिक स्कूल में एक शिक्षक के रूप में कार्य करना शुरू किया। चार वर्षों बाद उन्हें डोलारी बुद्रुक के खोमगडा स्थित स्कूल में शिक्षक के रूप में नियुक्ति मिली। इस गांव में 35 परिवार रहते हैं। और करीब 1500 की इनकी आबादी है। वहां मोरे ने देखा कि मजदूरी के लिए पलायन का रोग गांव के लोगों के साथ बड़ी संख्या में स्कूल में पढ़ने वाले बच्चे भी जा रहे हैं। जिसके बाद बाबू मोरे ने इस समस्या का हल निकालने की ठानी और कृषि विभाग व शिक्षा विभाग के अधिकारियों की मदद से स्कूल परिसर में खाली पड़ी जगह में लोगों को हरी सब्जी उगाने के लिए प्रेरित किया। शिक्षक बाबू मोरे का कहना है, कि शुरू में लोगों को कुछ नया करने के लिए मानसिक रूप से तैयार करना चुनौती थी। लेकिन समझाने के बाद गांव के लोग जो अभी तक केवल पारंपरिक खेती पर आश्रित थे वह अब 25 एकड़ में जी जान से मेहनत से सब्जियों की खेती कर अच्छी आय इकट्ठा कर रहे हैं। और अपने परिवार के साथ सुकून जीवन व्यतीत कर रहे हैं। एक ग्रामीण ने बताया कि शिक्षक बाबू मोरे ने जीवन को नई राह दी है। शिक्षक के मार्गदर्शन प्रयास की जिले भर में प्रशंसा हो रही है।

स्कूल बंद, बच्चों के लिए उपलब्ध शिक्षक

कोरोना संक्रमण के कारण स्कूल बंद है। लेकिन, ग्रामीणों को अपने परिवार मानने वाले शिक्षक बाबू मोरे गांव में ही डटकर बच्चों के सीधे संपर्क में हैं। और उन्हें कोरोना के संक्रमण से बचने के लिए जागरूक कर आगे बढ़ने के लिए लगातार प्रेरित कर रहे हैं।

लोगों ने मदद के लिए बढ़ाया हाथ

शिक्षक बाबू मोरे के अनोखे उपक्रम को बुंबई की अक्षरधारा नामक संस्था का भी साथ मिला है। और उनने ग्रामीणों की मदद के लिए एक लाख 35 हजार रुपये की मदद दी है। 2019-20 में ग्रामीणों ने 35 टन प्याज का उत्पादन किया है।

सब्जियों की भरमार

ग्रामीण अलग-अलग व्यापारियों से संपर्क, मंडी, पालक और मौसमी लगाई गई। जिसे फूलगोभी, पत्तागोभी, टमाटर और बैंगन के लिए अलग-अलग लाईन में बराबर तैयार किया जाता है। और वह नई प्रजाति की सब्जियों की भरमार रखती है। ग्रामीण अलग-अलग के बाजारों और मुंबई के व्यापारियों को सब्जियां बेच रहे हैं।

स्कूलों में बढ़ी बच्चों की संख्या

शिक्षक का प्रयास अब रंग लाया है। सब्जियों से ही रोजी आय से लोगों के परिवार चल रहे हैं। जिससे मजदूरी के लिए लोगों का गांव से होने वाला पलायन काफी हद तक रुक गया है। जिसका परिणाम है, कि जिस स्कूल में पहले 60 बच्चे थे वहां अब बच्चों की संख्या 115 तक पहुंच गई है। और यह कार्य बाल मजदूरी के बजाय स्कूल में शिक्षा ग्रहण कर अपना भविष्य संवार रहे हैं।

AKSHAR DHARA FOUNDATION Regn. No. 317803
805 / 806, Palm Project 'C' Co - op. HSG Society Limited
Link Road, Malad (West), Mumbai - 400 064 Tel. : +91 93725 81487
Email : enquiry@akshardhara.org Website : www.akshardhara.org

हमारी अक्षर धारा फाउंडेशन पिछले 2-3 साल से मुसलपाड़ा और खोनारपाड़ा यहां की स्कूलों में निरन्तर कार्य कर रही है।
2019-20 हमने स्कूलों के विकास के साथ साथ गाँव का भी विकास करने का विचार किया। जिसमें कि खोनारपाड़ा स्कूल के शिक्षक श्री बाबु चांगदेव मोरे किसानों के उत्थान के लिये मार्गदर्शन कर रहे थे। उनके सहयोग के साथ चलकर हमने जो किसान चावल की खेती करके दिवाली के बाद काम के लिये बाहर जाते थे। ऐसे लोगों को समझाकर एक संगठन बनाया गया। जिसमें उनको आधुनिक तथा वैकल्पिक खेती के बारे में उनका मार्गदर्शन किया। जिसमें उस क्षेत्र कि महिलाओं ने भी अपना पूर्ण सहयोग दिया। जिसका आर्थिक सहयोग अक्षर धारा फाउंडेशन के द्वारा किया गया। और किसानों का मार्गदर्शन श्री बाबु चांगदेव मोरे जी ने किया। इस प्रकल्प के तहत विभिन्न प्रकार के साग-सब्जियां उगाई गई जिनमें कि मेथी, पालक, धनिया, टमाटर, दुधी, कडु करेला, चना, बैंगन, टमाटर, ककडी, तरबुज, प्याज लगाया गया। जिसके परीणाम स्वरुप 35 टन प्याज का उत्पादन हुआ और इस बराबर कोरोना काल कि स्थिती में किसानों को ग्रामीण क्षेत्र में काम मिला और आमदनी भी अच्छी हुई और बच्चों को शिक्षा के लिये अन्यत्र किसी स्थान पर नहीं जाना पड़ा इस कार्य में सहायता करने के लिये हम शिक्षक श्री बाबु राव मोरे जी का हृदय से साधुवाद करते हैं।

FOR AKSHAR DHARA FOUNDATION
DIRECTOR

प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ.....बाबु.....चांगदेव.....मोरे..... प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देतें की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला ...."शाळेतील शेती ओल्हा पालकांच्या शेतात जाते"..... हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 18/11/2021

स्थळ : खोमारपाडा

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव :..बाबु.....चांगदेव.....मोरे

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

मुख्याध्यापक
जि.प.शाळा खोमारपाडा (चंद्रनगर),
ता.विक्रमगड,जि.पालघर

जि.प.प्राथमिक शाळा खोमारपाडा (चंद्रनगर) ता.विक्रमगड
जा.क्र 489
दि 18/11/20

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ.....बाबु.....चांगदेव.....मोरे..... हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला ....."शाळेतील शेती ओल्हा पालकांच्या शेतात जाते"..... हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 18/11/2021

स्थळ : खोमारपाडा

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव :..श्री. सुधाकर विनायक दशे

शिक्का:

मुख्याध्यापक
जि.प.शाळा खोमारपाडा (चंद्रनगर)
ता.विक्रमगड,जि.पालघर

जि.प.प्राथमिक शाळा खोमारपाडा (चंद्रनगर) ता.विक्रमगड
जा.क्र 490
दि 18/11/2